## हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर
## ता.खेड, जिल्हा पुणे
## विद्यार्थी विकास मंडळ अहवाल (२०१८-१९)

.....................................................................................................................

### कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना

सन 2018-2019 या शेक्षणिक वर्षामध्ये हुतात्मा राजगुरू महाविद्यालयामध्ये विद्यार्थी विकास मंडळांतर्गत कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना राबविण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मान्यतेनुसार या योजनेची कार्यवाही करण्यात आली. आर्थिकदुष्ट्या दुर्बल, अनुसूचित जाती, जमातीतील विद्यार्थ्यांना अतिरिक्त या योजनेचा लाभ व्हावा याकरिता हि योजना राबविण्यात आली.ग्रंथालय विभाग, परीक्षा विभाग, संगणक विभाग, ग्राहक भंडार विभाग, विविध विज्ञान विभाग, राष्ट्रीय सेवा विभाग, क्रीडा विभाग, प्रशासकीय विभाग, वाणिज्य विभाग, कला शाखेतील काही विभाग, महाविद्यालयीन मैदान, मुक्त विद्यापीठ विभाग कमवा वा शिका विभागातील विद्यार्थ्यांना विभागून दिले होते. सदर योजनेमध्ये 78 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये 63 विद्यार्थीनी व 15 विद्यार्थी होते. या योजनेअंतर्गत 4,70,025/- (चार लाख सत्तर हजार पंचवीस रुपये) खर्च करण्यात आले.

### निर्भय कन्या अभियान

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व विद्यार्थी विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१३, १४ व १५ फेब्रुवारी २०१९ रोजी आमच्या महाविद्यालयात निर्भय कन्या अभियान या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक-१३फेब्रुवारी रोजी कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. प्रमिला बांबळे, बालरोग तज्ज्ञ सुश्रुत हॉस्पिटल,राजगुरुनगर. यांनी 'महिलांचे आरोग्य व सबलीकरण' याविषयी मार्गदर्शन केले.या कर्यक्रमासाठी मा. प्राचार्य डॉ. एस. बी.पाटील अध्यक्ष होते. प्रा. लोणारी- विद्यार्थिनी कल्याण मंडळ, यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. मा. प्राचार्य डॉ. एस. बी.पाटील यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. प्रा. व्ही. वाय. रासकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी २३० पेक्षा जास्त विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थिनींना अल्पोपहार देण्यात आला. दिनांक-१४ फेब्रुवारी २०१९ रोजी ॲड. मनीषा टाकळकर यांनी 'महिलांविषयी कायदे व योजना' या विषयी मौलिक असे मार्गदर्शन केले .या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्रा. प्रतिमा लोणारी यांनी करून दिला. आणि आभार प्रा. कोळेकर एस.एस. यांनी मानले. या कार्यक्रमासाठी २३० पेक्षा जास्त विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थिनींना अल्पोपहार देण्यात आला.दिनांक-१५ फेब्रुवारी २०१९ रोजी मा. सागर गाडे, अष्टांग योग केंद्र,मुंबई माता बाळ संगोपन केंद्र, राजगुरूनगर. यांनी 'योगाचे स्त्रियांच्या जीवनातील महत्त्व' या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच सहभागी सर्व विद्यार्थिनींकडून त्यांनी योगाची प्रात्यक्षिके करून घेतली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संदीप ढोरे यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा. संदीप थोरात यांनी केले. या कार्यक्रमासाठी २३० पेक्षा जास्त विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थिनींना अल्पोपहार देण्यात आला.

Scanned by CamScanner

## मुद्रितशोधन कार्यशाळा

विद्यार्थी विकास मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे आणि मराठी विभाग, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने दि. 20 ते 22 फेब्रुवारी 2019 रोजी मुद्रितशोधन या विषयावरील तीन दिवसीय विद्यापीठस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन कार्यक्रम पुण्याच्या एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठातील डॉ. मनीशा खैरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या प्रसंगी प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील, उपप्राचार्य डॉ.व्ही.डी.कुलकर्णी, कार्यशाळेचे समन्वयक डॉ. संजय शिंदे, भूगोल विभाग प्रमुख प्रा.दिलीप मुळूक, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. तीन दिवसीय कार्यशाळेत दि. 20 फेब्रुवारी 2019 रोजी प्रथम मुद्रितशोधनाचे महत्त्व या विषयावर डॉ. मनीषा खैरे यांनी विद्यार्थांना माहिती सांगून मुद्रितशोध चिन्हांची ओळख करून दिली. दि. 21 फेब्रुवारी 2019 रोजी पुण्याच्या प्रा. गौरी गोळे लिमये यांनी विद्यार्थ्यांना शुद्धलेखनाच्या नियमाबद्दल माहिती सांगितली. दि. 22 फेब्रुवारी 2019 रोजी प्रा. साईनाथ पाचारणे यांनी प्रमाणभाषा लेखन या विषयावर बोलताना शब्दोच्चार, शब्दलेखन आणि वाक्यरचना या तीनही आघाड्यांवर भाषेच्या व्याकरणाचे लेखनस्वरूपात अचूक पालन करणे गरजेचे असल्याचे सांगून त्यांनी शुद्धलेखनाच्या जोडीने मराठीमध्ये प्रमाण उच्चार व लेखनकोशांची आवश्यकता व्यक्त केली. या कार्यशाळेचे आयोजन विद्यार्थी विकास मंडळाचे डॉ. विकास रासकर, डॉ. बी.डी.अनुसे, प्रा. संदीप थोरात, प्रा. प्रभाकर जगताप, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. श्वेतांबरी आल्हाट, प्रा. योगिनी राऊत यांनी केले.

सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मा. प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील, डॉ.एच. एम. जरे-उपप्राचार्य वाणिज्य विभाग, डॉ.व्ही.डी.कुलकर्णी-उपप्राचार्य विज्ञान विभाग, डॉ. एस.डी.शिंदे-उपप्राचार्य कला विभाग, प्रा. एस.एस. कोळेकर, प्रा. नीता डोंगरे, प्रा. एस.एस. आल्हाट, प्रा.पी.पी.ओसवाल, प्रा.अपर्णा कुलकर्णी, प्रा.चौधरी, प्रा. संदीप ढोरे, प्रा. संदीप थोरात, प्रा.संतोष कारले, प्रा. नेहा लोंढे, प्रा.एस. निकम यांचे अनमोल असे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. विद्यार्थी विकास मंडळाकडून चालू वर्षातील विविध परिपत्रकानुसार त्या संदर्भात योग्य अंमलबजावणी करून अहवाल वेळोवेळी विद्यापीठास पाठविण्यात आले.

प्रा. व्ही. वाय. रासकर
विद्यार्थी विकास अधिकारी
हु.रा.महाविद्यालय,राजगुरूनगर

प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील
**Principal**
*Hutatma Rajguru Mahavidyalaya*
*(Arts, Science & Commerce)*
*Rajgurunagar.*

Scanned by CamScanner